MHKO070021142018

<u>नियमीत दिवाणी दावा क्रं.४/२०१९ मधील नि.क्रं.२० वरील आदेश.</u>

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्रं.१,२ व ५ तर्फे दाखल करणेत आलेला असून त्याव्दारे त्यांची " कैफियत " दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफियत कामात सामील करुन घेणेची मागणी केलेली आहे.

२. प्रस्तुत प्रतिवादीचे म्हणण्याप्रमाणे, वादी यांनी प्रतिवादी विरुध्द कायम मनाईचा दावा दाखल केला असून प्रस्तुत दावेकामी प्रतिवादी हे दि.१/२/२०१९ रोजी विधिज्ञामार्फत हजर झालेले आहेत. यातील माहितगार प्रतिवादी नं.१ यांचा अपघात झालेने त्यांना हिरेमठ हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले होते व त्याचे उपचारासाठी प्रतिवादी नं.२,५ यांना रहावे लागत होते. त्यामुळे सदर दावेकामी मुदतीत आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन, वकीलांना भेटून त्यांना माहिती देता आलेली नसलेने प्रस्तुत प्रतिवादी यांना मुदतीत कैफियत दाखल करता आलेली नाही. सदरचा दावेचा गुणदोषावर निर्णय होणेकामी प्रतिवादीची कैफियत रेकॉर्डवर घेणे आवश्यक व न्यायाचे होणार आहे. तरी, प्रस्तुत प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास ५२ दिवसांचा झालेला विलंब माफ होवून कैफियत दाखल करुन घेणे बाबत विनंती केली आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर होणेस विनंती केली आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांचा कैफियत दाखल करण्यास झाले विलंबाची कारणे ही मान्य करता येण्यासारखी नाहीत. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे. जर मे.कोर्टानी सदरचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी याना कॉस्ट करणेत यावी ही विनंती.

४. उभय पक्षांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुतकामी प्रतिवादी नं.१,२ व ५ यांना समन्स (नि.७) लागू होवून प्रस्तुत दावेकामी विधिज्ञामार्फत हजर झाले. तथापि, त्यांनी विहित मुदतीत वादीचे दावेस

कैफियत दाखल केलेली नाही. प्रस्तुतचा अर्जा सोबत त्यांनी त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. प्रस्तुत अर्जात कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब हा वैद्यकिय कारणामुळे झाल्याचे नमूद केलेले आहे. तसेच प्रतिवादी यांनी नि.१९/१ वर हिरेमठ हॉस्पीटल, जयसिंगपूर येथे दि.२१/०३/१९ ते दि.२३/३/१९ अखेर प्रतिवादी नं.१ हे ॲडमिट असून त्याचेवर उपचार चालू होते त्याबाबतचे आय.पी.डी. सर्टीफिकेटची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. तसेच दरम्यानचे काळात प्रतिवादी नं.१ यांची सेवा करणेसाठी प्रतिवादी नं.२ व ५ यांना दवाखान्यात रहावे लागत असलेचे कथन केले आहे. त्यामुळे त्यांना दावेकामी आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, वकीलांना भेटून त्यांना माहिती देता आलेली नसलेने त्यांना दाव्याकामी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंबाचे कथन कलेले आहे. कैफियत दाखल करण्यास प्रतिवादी यांना जवळपास ५२ दिवसाचा विलंब झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे एकंदरित कागदपत्रावरुन प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंब हा जरी संयुक्तीक वाटत असला तरी झालेल्या विलंबामुळे विरुध्द पक्षकारांची गैरसोय झालेली आहे. परंतु प्रतिवादी पक्षास म्हणणे मांडण्याची संधी दिल्यास नैसर्गिक न्यायतत्वाने प्रस्तुत दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होणार आहे. न्यायालयीन कार्यपध्दतीचे कायदे हे न्यायाच्या हेतूस्तव बनविण्यात आलेले असतात. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीस झालेली गैरसोय ही खर्चाच्या माध्यमातून भरुन काढता येण्यासारखी आहे. वरील नमूद सर्व कारणांचा तसेच विलंब कालावधीचा विचार करता खर्च देण्याच्या अटींवर अर्ज मंजूर करणे उचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.१, २ व ५ यांनी वादीस र.₹५००/- अर्जाचा खर्च म्हणुन देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. खर्चाची रक्कम अदा केलेनंतर प्रतिवादी नं.१, २ व ५ यांची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

सही/-
(व्ही.पी.शिंदे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर

दिनांक – १७/०७/२०१९.